प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये तसेच विकास आराखड्यामध्ये निवासी, वाणिज्यीक, औद्योगिक अकृषिक वापरासाठी शेती महामंडळाच्या जमिनी ई-निविदेद्वारे खाजगी व्यक्ती/संस्था/कंपनी यांना भाडेकराराने देणे अथवा शासकीय संस्था/ निमशासकीय संस्था यांचेबरोबर संयुक्त उपक्रमाद्वारे विकसित करणेकरीता..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्र. मशेम-२०२४/प्र.क्र.४९/ल-७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
पहिला मजला (मुख्य इमारत) मंत्रालय , मुंबई ४०० ०३२.
दिनांक :२४/०७/२०२४

संदर्भ:- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे जा.क्र-जमीन-२/वापरात बदल/२०२४/ज-१३४९ दि. २५/०६/२०२४ रोजीचे पत्र.

शासन आदेश:-

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांच्याकडुन संदर्भिय पत्रान्वये प्राप्त प्रस्तावास खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

i. अकृषिक वापरासाठी आरक्षित असलेल्या जमिनींचा अनुज्ञेय असलेला अकृषिक वापर करण्याच्या दृष्टीने महामंडळाकडील अशा सर्व जमिनी महामंडळास ई-निविदेद्वारे खाजगी व्यक्ती / संस्था / कंपनी यांना भाडेकराराने देणे अथवा शासकीय संस्था / निमशासकीय संस्था यांचे बरोबर संयुक्त उपक्रमाद्वारे विकसित करणेकरीता जमिनीचे वापर मुल्य / भाडेपट्टा / अपसेट प्राईज / मागणीचे मुल्यांकन ठरविणे व इतर अनुषंगिक बाबीचे कामकाज करणेकरीता समिती.

| अनु.क्र. | समिती | |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. पुणे | अध्यक्ष |
| २ | संबधित कार्यक्षेत्रातील सहाय्यक संचालक नगररचना (ADTP) | सदस्य |
| ३ | संबधित कार्यक्षेत्रातील सहजिल्हा निबंधक (JDR) | सदस्य |
| ४ | संबधित कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी | निमंत्रित सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी (वित्त) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. पुणे | सदस्य सचिव |

Scanned with OKEN Scanner

SCAN AnyScanner

ii. शेती महामंडळाच्या जमिनी अनुज्ञेय अकृषिक वापराकरीता ई-निविदेद्वारे खाजगी व्यक्ती / संस्था / कंपनी यांना भाडेकराराने देणे अथवा शासकीय संस्था / निमशासकीय संस्था यांचेवरोबर संयुक्त उपक्रमाद्वारे विकसीत करण्यासाठी वखार महामंडळ, एम.आय.डी.सी. किंवा शासन मान्य स्वायत्त संस्था अशा संस्थांना भाडेपट्टा, पार्टनरशिप किंवा संयुक्त उपक्रमाने जमिनीचा वापर करणे बाबतची कार्यवाही.

iii. अटी व शर्ती

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(तानाजी सरावणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई ३२
२)अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, यांचे स्वीय सहायक
३)व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ (मर्या.), पुणे
४)निवडनस्ती (ल-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२

SCAN AnyScanner